

# नेलं साठवलेलं गाठोडं बया
# केलं पब्लीकच गं वाटोळं बया!



अमरावती-रिंगरोडवर कचऱ्यासाठी रास्ता रोको आंदोलन करताना जनसामान्य

**रोहित गासे**
**अमरावती,( दि.8 )- 21 व्या शतकातील सुरुवातीचे दशक अंबानगरीसाठी डॉ.सुनिल देशमूखांच्या रुपाने विकासाचे ठरले. अमरावती शहराने कधी नव्हे तो विस्तारित रस्ते, उड्डाणपूल, दुभाजकांचे सौदर्यीकरण, हायमास्ट लाईटची रोषणाई शहराने पाहिली. विभागातील पाचही जिल्ह्यात दृष्ट लागावी असे शहर तत्कालीन विकास पुरुष डॉ. सुनील देशमूखांनी करुन दाखविले. मात्र गेल्या सहा वर्षात राष्ट्रवादी काँग्रेसच्या( घड्याळ ) कारकीर्दीत शहराचा झालेला सत्यानाश हाही इतिहासात नोंद करण्यासारखा आहे. माजी आमदार डॉ. सुनिल देशमूखांनी साठवून ठेवलेले विकासाचे गाठोडं पळवून विद्यमान आमदारांनी पब्लीकचं वाटोळं केलं आहे.**







महापालिकेवर प्रशासक असताना शहराचे लोकप्रतिनिधी हे त्या क्षेत्राचे आमदार असतात. शहराची सुस्थिती व दुर्दशेकरिता त्या क्षेत्राचे आमदार जबाबदार असतात. मात्र सन 2021 मध्ये महापालिका सभागृहाचा कार्यकाळ संपल्यानंतर शहराच्या विकासाला उतरती कळा आली. शहरातील गल्ली, वस्त्यांमध्ये विकासाच्या नावावर फक्त विद्यमान आमदारांच्या हस्ते भूमिपूजनाचे फलक दिसायला लागले. असे फलक सन 2008 पुर्वी बडनेरा मतदार संघात पहायला मिळायचे. मात्र बडनेरा मतदार संघाच्या सुज्ञ नागरिकांनी तेव्हा 'फलकबाज' आमदाराला घरचा रस्ता दाखविला. आता ती आपत्ती अमरावती विधानसभा मतदारसंघावर घोंघावत आहे. आपलेच कार्यकर्तेच कंत्राटदार बनवून अंबानगरीच्या विकासाचे वस्त्रहरण करण्याचा गोरखधंदा सध्यास्थितीला अमरावतीमध्ये पहायला मिळत आहे. इतवाऱ्यातील उड्डाणपूल पुर्णत्वा अभावी सांगाडा होवून नागरिकांसाठी दिवसेंदिवस दिवास्वप्न बनत जात आहे. शहराचे एंट्री रस्ते उदा. नवसारी, रिंगरोडवरिल आराधना स्क्वेअर तुंबलेल्या कचऱ्यांनी नागरिकांच्या स्वागतासाठी सज्ज असतात. एकीकडे विकास करायचे नाव नाही आणि दुसरीकडे आमदारव्दयांचा डोळा शहरातील खुल्या ऐतिहासिक मैदानांवर असतो. ऐनकेन प्रकारे शहरातील मोठमोठे मैदान कसे आपल्या घश्याखाली उतरविता येईल, याचा तडफड प्रयत्न सुरु असतात. यांच्या अख्यत्यारित झालेले सिमेंट रस्त्यांना आतापासूनच मोठमोठ्या भेगा पडायला लागल्या आहे. शहरातील खेळाचे मैदान मुद्दाम विकासापासून वंचित ठेवले जात आहे. उदा.जवाहर नगरात अष्टविनायक मंडळाच्या मैदानाच्या विकासासाठी 'वर्कऑर्डर' निघालेली असताना मुद्दाम आमदाराव्दयांच्या 'बाल्या' ने आपले राजकीय हितसंबध जोपासण्याकरिता या मैदानाचा विकास केला नसल्याचा आरोप जवाहर नगरवासी करित आहे. त्यामूळेच भूमिपूजनाकरिता आलेल्या आमदारांना येथील नागरिकांच्या संतापाला बळी पळावे लागले. हे चित्र संपुर्ण शहरात आहे. मात्र असे असताना महापालिका निवडणूकीच्या रुपाने आपल्या पक्षाकडून 87 उमेदवार उभे करुन महानगर पालिकेची वाट लावण्याचा घाट सद्यास्थितीला घातला जात आहे. जो सुज्ञ नागरिकांच्या लक्षात आल्याचे दिसत आहे. त्यामूळे या निवडणूकीमध्ये नागरिक यांना विरोधकांच्या बाकावर बसवतील यात दुमत नाही.

## खोटी भाषणे आणि मोठमोठ्या गोष्टी

आपला नेता आला की, मंचावरुन खोटी भाषणे करणे, बेरोजगारी दुर करण्याच्या बाबतीत मोठमोठ्या गोष्टी केल्या जातात, मात्र त्या प्रत्यक्षात कधीच उतरविल्या जात नाही. एमआयडीसीमध्ये नवनविन कारखाने आणण्याच्या दृष्टीने कधीच प्रयत्न केला जात नाही. कलाकारांना कधीच राजाश्रय मिळत नाही, शहरात हक्काचे एकही असे कलादालन नाही, किंवा कलादालनाच्या निर्मीतीकरिता प्रयत्नही केल्या जात नाही.

## गुंड, सट्टेबाज उमेदवार

शहरात महिन्याला चार खून होत आहे, एमडी ड्रग्जच्या विळख्यात शहर अडकले आहे. एकीकडे राज्याच्या सभागृहा गुन्हेगारीबाबत चिंता व्यक्त करायची आणि दुसरीकडे महापालिका निवडणूकीत गुंड, सट्टेबाजांना उमेदवारी वाटायची असा प्रकार सध्या पहायला मिळत आहे. त्यामूळे भविष्यात शहरातील सुरक्षा टांगणीला लागेल यात शंका नाही.

## राजकीय घडामोड शहराच्या मूळावर उठली

सन 2009 मध्ये राष्ट्रपती पुत्र रावसाहेब शेखावत आमदार बनले, मात्र शहराचा विकास मागे पडला, त्यानंतर भाजपच्या तिकीटवर डॉ.सुनिल देशमूख पुन्हा आमदार झाले. या व्हिजनरी आमदारामूळे शहराच्या विकासाने पुन्हा कात टाकली, मात्र काँग्रेसमध्ये पुन्हा खेळी झाली आणि सुनिल देशमूख पराजित झाले, तेव्हापासून हे शहर विकासाला मूकले आहे.



# मोर्शी पोलिसांची गांजा विक्रेत्यावर मोठी कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.8 )-** शहरात अवैध धंद्यांविरोधात कडक कारवाईचा इशारा देत मोर्शी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे गांजा विक्री करणाऱ्या इसमावर छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत 245 ग्रॅम वजनाचा अवैध गांजा जप्त करण्यात आला असून संबंधित इसमाविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आमदखान बिस्मील्लाखान (रा. काजीपुरा, मोर्शी) असे आहे.

राजपत्रित अधिकारी चारूदत्त पाटील, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय मोर्शी तसेच दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत आरोपीच्या घराची कायदेशीर झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान आमदखान बिस्मील्लाखान याच्याकडे अवैधरित्या गांजा (कॅनाबीस) विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून 245 ग्रॅम वजनाचा गांजा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी गुंगीकारक औषधीद्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (एनडीपीएस) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले, ठाणेदार मोर्शी यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत पोउपनि आकाश शिवणकर, पोउपनि तुषार चव्हाण यांच्यासह पोलीस अंमलदार व कर्मचारी सहभागी झाले. या धडक कारवाईमुळे अवैध अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पुढील काळातही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा मोर्शी पोलिसांनी दिला आहे.

# आई-बाबा, माझ्या भविष्याकरिता मतदान करा'

### अमरावतीत मतदान जनजागृतीचा अभिनव उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.8 ) -** लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक असून, आगामी अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेतर्फे विविध नाविन्यपूर्ण जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या मालिकेत स्वीप (स्ङ्कश्वश्वक्क) योजनेअंतर्गत 'आईङ्कबाबा, माझ्या भविष्याकरिता मतदान करा'हा अभिनव व भावनिक उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची सुरुवात अंबापेठ येथील मणिबाई गुजराथी हायस्कूलमधून करण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांच्या पालकांपर्यंत थेट मतदानाचा संदेश पोहोचविण्यावर भर देण्यात आला आहे. लोकशाहीची खरी ताकद मतदारांच्या सहभागात असून, मतदान हा प्रत्येक पात्र नागरिकाचा हक्क व कर्तव्य आहे. मात्र विविध कारणांमुळे अनेक नागरिक मतदान प्रक्रियेपासून दूर राहतात. ही उदासीनता दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांचे निरागस व भावनिक आवाहन प्रभावी ठरत असल्याचे प्रशासनाचे मत आहे. या उपक्रमांतर्गत अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जाणार असून, 'आईङ्कबाबा, माझ्या उज्वल भविष्यासाठी मतदान करा' असे आवाहन करून विद्यार्थी आपल्या पालकांना मतदानासाठी प्रेरित करणार आहेत. स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व, मतदार नोंदणी, मतदान प्रक्रिया व प्रत्येक मताचे मूल्य याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. या उपक्रमामुळे पहिल्यांदाच मतदान करणारे तसेच उदासीन मतदार सकारात्मक प्रतिसाद देतील, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## एसीमधील तांब्याच्या पाईपची चोरी

**अमरावती** - सिटी कोतवाली पोलिस ठाण्याच्या परिसरातील जयस्तंभ चौकातील सामरा कॅम्प येथे बुधवारी रात्री उशिरा अज्ञात चोरट्यांनी एअर कंडिशनरमधील तांब्याचे पाईप चोरून नेल्याची घटना घडली. या चोरीत सुमारे 20 हजार रुपये किमतीचे तांब्याचे पाईप लंपास करण्यात आले. याप्रकरणी दिनेश भंवरलाल सामरा यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी अज्ञात संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## दुचाकी चोरी

**अमरावती** - गाडगेनगर पोलीस स्टेशन परिसरातील कठोरा रोडवरील रोहिणी पार्क कॉम्प्लेक्समधून मंगळवारी रात्री उशिरा अज्ञात संशयिताने दुचाकी चोरल्याची घटना घडली. या प्रकरणी अजय पाटील (वय 37) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# बेकायदेशीर हातभट्टीवर पोलीसांची वक्रदृष्टी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.8 )-** शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे शाखेच्या पथकाने बेकायदेशीर हातभट्टी दारूविरोधात मोठी कारवाई करत सुमारे 77 हजार 850 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून तो घटनास्थळीच नष्ट केला. ही कारवाई गुरुवारी (दि. 8) करण्यात आली. गुन्हे शाखेचे पथक नियमित पेट्रोलिंग करत असताना, वडाळी बांबू गार्डनकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या जंगल परिसरात हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ छापा टाकला असता, दिनेश माणिकराव नेमाडे (वय 40, रा. परिहारपुरा, वडाळी, अमरावती) हा हातभट्टी दारू काढताना रंगेहात आढळून आला. कारवाईदरम्यान आरोपीकडून 100 लिटर हातभट्टी दारू, 200 लिटर मोह माशाचा सडवा, तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण 77,850 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेले सर्व साहित्य कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत कलम 65 (क)(फ)(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. शहरात बेकायदेशीर दारू निर्मिती व विक्रीविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## महिलेवर काठीने हल्ला

**अमरावती** - गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रामपुरी कॅम्प येथे राहणाऱ्या 54 वर्षीय महिलेवर जुन्या वादाच्या कारणावरून काठीने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी बुधवारी पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी संजय दवणे व इतर दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहेत.

# जन्मठेपेतील कैद्याकडून हवालदाराला जीवे मारण्याची धमकी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.8 ) -** अमरावती मध्यवर्ती कारागृहात शिस्तीचा गंभीर भंग करणारी घटना समोर आली असून, जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याने कर्तव्यावर असलेल्या हवालदाराला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे कारागृहातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

ही घटना बुधवार, 7 जानेवारी 2026 रोजी रात्री घडली. याप्रकरणी हवालदाराच्या तक्रारीवरून फ्रेझरपुरा पोलिस ठाण्यात आरोपी नितीश अनिल जयस्वाल (वय 33, रा. म्हाडा, नागपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वृत्तानुसार, नितीश जयस्वाल याच्याविरुद्ध



नागपूर शहरातील इमामवाडा पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात विशेष न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तो 30 जुलै 2016 पासून कारागृहात असून, 3 जुलै 2024 रोजी त्याची नागपूर मध्यवर्ती कारागृहातून अमरावती मध्यवर्ती कारागृहात बदली झाली होती. घटनेच्या दिवशी आरोपी भेटवस्तू वितरणासाठी संबंधित ठिकाणी आला असता त्याने ड्युटीवरील हवालदाराकडे भाज्या देण्याची मागणी केली. मात्र नाव यादीत नसल्याने हवालदाराने नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने हवालदाराला शिवीगाळ करत कॉलर व बकल पकडून ढकलले, ज्यात बकलवरील बटण तुटले. तसेच इतर कर्मचाऱ्यांनाही जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून, कारागृह प्रशासनानेही घटनेची गंभीर दखल घेतली आहे.

# विद्यमान खासदारांना एकही विकासकाम दाखविता येत नाही!

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचे काँग्रेसवर टीकास्त्र

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.8 )-** लोकसभेत पंजा निवडून आला; मात्र तो खासदार आज अमरावतीत कुठे आहे? कधी जनतेसमोर दिसला का? एक तरी ठोस विकासकाम दाखवता येईल का? असा थेट सवाल उपस्थित करत पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी अमरावतीत झालेल्या प्रचारसभेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. माजी खासदार नवनीत राणा यांचा अवघ्या 18 हजार मतांनी पराभव झाला



असला, तरी काँग्रेसने अमरावतीचा सत्यानाश केल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सभेत बोलताना बावनकुळे यांनी विकसित, सुरक्षित व भयमुक्त अमरावतीसाठी भाजपला मतदान करण्याचे आवाहन केले. विकसित आणि भयमुक्त अमरावतीची 100 टक्के गॅरंटी भाजप देईल. आगामी महापौर भाजपचाच असेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सभेला राज्यमंत्री पंकज भुयार, खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रतापदादा अडसळ, प्रवीण तायडे, राजेश बाकाने, संजय कुटे, माजी आमदार प्रवीण पोटे, शहराध्यक्ष नितीन धांडे यांच्यासह भाजपचे उमेदवार व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कमळाला दिलेले एक मत म्हणजे तब्बल 124 विकास योजनांना दिलेला पाठिंबा असल्याचे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, भाजपला मतदान करणे म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणे होय. ही निवडणूक विकासाची असून अमरावतीला शिस्तबद्ध व सुरक्षित शहर बनविण्याचा संकल्प भाजपचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

### अमरावती भयमुक्त करणार

अमरावती शहर भयमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त करत गोवंशहत्या, अमली पदार्थांची विक्री व गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नसल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. बेलपूरा भागासह शहरातील 15 ठिकाणी सुलभ शौचालये उभारण्याची घोषणाही त्यांनी केली. शेवटी काँग्रेसवर पुन्हा टीका करत केवळ निवडणुकीपुरते शहराची आठवण काढणाऱ्यांनी विकासावर बोलावे, असे सांगून भाजप उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.


## निविदा जाहिरात

बुद्धीजीवी फार्मर प्रोडूसर कंपनी, प्रा. लिमिटेड
मु.पो. लोणी (टा.) ता. नांदगांव (खंडे) जि. अमरावती
(नोंदणी क्र. U01611MH2024 PTC 42/363)
संचालक मंडळाकडून खालील साहित्याच्या खरेदीसाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे

**साहित्य विवरण**
१. ५० HP ट्रॅक्टर (महिंद्रा कंपनीचा)
२. क्लीनिंग व ग्रेंडिंग मशिन युनिट (600 kg/hr process)
३.मिनी दाल मिल (600 kg/hr process)
४. ऑल टाईप ड्रायर
५. ऑल टाईप पॉलीशर
६. रोटावेटर (शक्तीमान कंपनीचे) १.८ मिटर
७. शेड बांधकाम करणे ५०X३० = १५०० स्क्वे.फूट
८. कल्टीवेटर (पंजी)

तसेच शेतकरी बचत गआंचे साहित्य खरेदीसाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.
१. बळीराजा शेतकरी बचत गट लोणी २४ HP महिंद्रा ट्रॅक्टर
२. कृषीबाबा शेतकरी बचत गट नागझरी २४ HP महिंद्रा ट्रॅक्टर
३. बळीराजा सेंद्रीय बचत गट अजनी २४ HP महिंद्रा ट्रॅक्टर
४. बळीराजा शेतकरी बचत गट दहिगांव २४ HP महिंद्रा ट्रॅक्टर

**इच्छुक पुरवठादारांनी त्यांचे दरकोटेशन ( GST सहित ) सिलबंद लिफाफ्यात ट्रॅक्टर व उपकरण खरेदी निविदा असा उल्लेख करून द्यावेत**

**निविदा सादर करण्याची अंतिम तारीख** :- १७.१.२०२६ शनिवार
**सादर करण्याचे ठिकाण** : - बुद्धीजीवी फार्मर प्रोडूसर कंपनी प्रा.लि. मु.पो. लोणी (टा.) ता. नांदगांव (खंडे.), जि. अमरावती
**संपर्क क्रमांक** :- ९९२२७९६९१९, ८९९९६९८५५६

**निविदा उघडण्याचा कार्यक्रम संचालक मंडळाच्या उपस्थितीत निश्चित तारखेला पार पडेल. संचालक मंडळास कोणतीही निविदा न स्विकारण्याचा/रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार राहिल.**

**संचालक मंडळ**
**बुद्धीजीवी फार्मर प्रोडूसर कंपनी प्रा. लि. लोणी**

# ग्रामपंचायतींवर प्रशासक राज लागणार ?

## जिल्हा प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी ( दि.8 ) –** जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींचा कार्यकाळ येत्या जानेवारीफेब्रुवारी 2026 दरम्यान संपत असल्याने, त्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता बळावली आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने हालचालींना वेग दिला असून, प्रशासकीय तयारी अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे संकेत मिळत आहेत.

जिल्हा परिषद अमरावतीच्या पंचायत विभागाने सर्व पंचायत समित्यांना पत्र पाठवून दि. 1




जानेवारी 2026 ते दि. 28 फेब्रुवारी 2026 या कालावधीत ज्यांचा कार्यकाळ संपत आहे, अशा ग्रामपंचायतींची सविस्तर माहिती तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. ही माहिती प्रपत्र–1 व प्रपत्र–2 मध्ये भरून सॉफ्ट व हार्ड कॉपी स्वरूपात दोन दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, ग्रामपंचायत निवडणुकांबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसल्याने निवडणुका लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा पर्याय जिल्हा प्रशासनाकडून विचाराधीन असल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे.

या घडामोडींमुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापले असून, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या जागी प्रशासकीय अधिकाऱ्यांचा कारभार सुरू होणार का, याबाबत ग्रामस्थांमध्ये उत्सुकता आहे. अमरावती जिल्ह्यातील तब्बल 557 ग्रामपंचायतींच्या भवितव्याकडे सध्या संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, निवडणूक कार्यक्रम जाहीर होतो की प्रशासक राजवट लागू होते, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

### सरपंचांनाच प्रशासक करा

जिल्ह्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये सध्याचे कार्यरत सरपंच यांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात यावे, अशी ठाम मागणी राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघ, नवी दिल्ली यांनी केली आहे. संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले यांनी यासंदर्भात शासन व जिल्हा प्रशासनाकडे निवेदन दिले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, 1959 नुसार प्रशासकाला सरपंचाचे सर्व अधिकार मिळतात. त्यामुळे निवडणुका लांबणीवर गेल्यास विद्यमान सरपंचांनाच प्रशासकपद दिल्यास विकासकामे सुरळीत राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

# अमरावती महापालिका निवडणुकीसाठी ईव्हीएम सिलींग प्रक्रियेला सुरुवात



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 8 )–** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 202526 पारदर्शक, सुरक्षित व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाने तयारीला गती दिली आहे. त्याच अनुषंगाने गुरुवारी (दि. 8) सकाळी 10 वाजता महानगरपालिकेच्या झोन क्रमांक 1 ते 7 येथील सुरक्षा कक्षांमध्ये ईव्हीएममधील बॅलेट युनिट व कंट्रोल युनिटच्या सिलींग प्रक्रियेला अधिकृत प्रारंभ करण्यात आला.

या प्रक्रियेची पाहणी करण्यासाठी निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सर्व झोनना भेटी देत प्रत्यक्ष आढावा घेतला. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन होत आहे की नाही, याची त्यांनी तपासणी केली. ईव्हीएम सिलींग प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक व नियोजित पद्धतीने पार पडत असून, यावेळी अधिकृत निवडणूक कर्मचारी, संबंधित अधिकारी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच सुरक्षादलाचे कर्मचारी उपस्थित होते.

प्रत्येक ईव्हीएमची तपासणी, नोंदणी व सीलबंद प्रक्रिया नियमांनुसार करण्यात येत असून, सुरक्षिततेला विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. यावेळी आयुक्त चांडक यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा कणा असून पारदर्शकता व विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर नियमांचे पालन आवश्यक आहे. शांततेत, निर्भय व निष्पक्ष वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# सर्वोदय शिक्षण समितीकडून क्रांतीज्योती सावित्रिबाईंची जयंती



**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.8 )–** शिक्षणाच्या स्वर्गाचे जिने उघडले दार, तीच सावित्री आज जगाची शिलेदार, या प्रेरणादायी विचारांच्या साक्षीने हिवरखेड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वोदय शिक्षण समिती, हिवरखेड संचालित गंगाबाई सितारामजी चौधरी कन्या हायस्कूल, महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. न. दा. वासनकर उर्फ बावाजी सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वोदय शिक्षण समितीचे अध्यक्ष साहेबराव पाटील होते. प्रमुख वक्त्या म्हणून समाजसेविका, कवयित्री व प्रबोधनकार उज्वला पाटील (नागपूर) उपस्थित होत्या. तर समाजसुधारक नारायणराव मेंढे हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका संजया टाक यांनी केले. प्रमुख वक्त्या उज्वला पाटील यांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनाचा प्रेरणादायी आढावा घेत शिक्षण, समता व सामाजिक न्यायाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सादर केलेल्या कवितांनी उपस्थितांना भारावून टाकले. यावेळी त्यांचा सत्कार नारायणराव मेंढे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे आरती संजय नागवंशी हिने साकारलेली सावित्रीबाई फुले यांची हुबेहूब वेशभूषा. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, महिला भगिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन वंदना आमझरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सोमकुवर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता सांघिक पसायदानाने करण्यात आली.

# आर्यन-कैवल्यची विज्ञानात बाजी; 'जिज्ञासा'प्रदर्शनीत अव्वल

## धामणगावात 37 प्रतिकृतींचा सहभाग

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.8 ) –** धामणगाव एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित आदर्श विज्ञान, जे. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे यांच्या वतीने आयोजित 'जिज्ञासा' विज्ञान प्रदर्शनी2026 मध्ये आर्यन शशांक तायवाडे व कैवल्य चौधर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट वैज्ञानिक मांडणी सादर करत प्रथम क्रमांक पटकावला. स्व. लक्ष्मीनारायण अग्रवाल (भूतपूर्व अध्यक्ष, धामणगाव एज्युकेशन सोसायटी) यांच्या जन्मदिनानिमित्त 8 जानेवारी 2026 रोजी ही प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. या प्रदर्शनीत विज्ञानाच्या विविध विषयांवर आधारित एकूण 37 प्रतिकृती सादर करण्यात आल्या.

गट 'अ' मध्ये सहभागी असलेले आर्यन व कैवल्य हे विद्यानिकेतन सीबीएसई स्कूल, धामणगाव रेल्वे येथील विद्यार्थी असून, त्यांच्या नाविन्यपूर्ण, उपयुक्त आणि संशोधनाधारित प्रतिकृतीने



परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. संकल्पना, सादरीकरण व सामाजिक उपयुक्तता या निकषांवर त्यांनी इतर स्पर्धकांवर सरशी मिळवली. प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष शरदकुमार अग्रवाल यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रदर्शनीमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवसर्जनशीलतेला चालना मिळाल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

# शांताबाई शेटीये यांचे निधन

**वरुड –** जितेंद्र शेटीये व रवींद्र शेटीये यांच्या मातोश्री शांताबाई रामस्वरूप शेटीये यांचे बुधवार, दिनांक 7 जानेवारी रोजी रात्री साडेदहा वाजता राहत्या घरी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने शेटीये कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. स्वर्गीय शांताबाई या सुस्वभावी, मितभाषी आणि कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वपरिचित



होत्या. कुटुंबीयांप्रती असलेली आपुलकी, समाजातील स्नेहभाव आणि साधेपणाची जीवनशैली यामुळे त्यांनी सर्वांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दिनांक 8 जानेवारी रोजी दुपारी 2 वाजता केदारेश्वर मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीसाठी नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अश्रुपूरित नेत्रांनी त्यांना अखेरचा निरोप दिला.

# रुग्णसेवक ते नगरसेवक : नरेंद्र वानखडे यांचा प्रेरणादायी प्रवास

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.8 ) –** चांदूर बाजार नगर परिषदेच्या निवडणुकीत वॉर्ड क्रमांक 2 मधून भाजपचे उमेदवार सुदेश भेले यांचा पराभव करत नरेंद्र वानखडे यांनी मिळवलेला विजय हा केवळ राजकीय यश नसून जनतेच्या विश्वासाचा स्पष्ट कौल ठरला आहे. अनेक वर्षे रुग्णसेवक म्हणून नि:स्वार्थपणे केलेल्या समाजसेवेच्या बळावर त्यांनी हा टप्पा गाठला आहे. नरेंद्र वानखडे हे गेल्या अनेक वर्षांपासून चांदूर बाजार शहरात रुग्णसेवक म्हणून कार्यरत आहेत.



आजारपण, अपघात, आपत्कालीन परिस्थिती किंवा गरजू रुग्णांची मदत—प्रत्येक प्रसंगी त्यांनी माणुसकीच्या भावनेतून सेवा दिली. कोणताही भेदभाव न करता, प्रसिद्धीपासून दूर राहून केलेल्या या कार्यामुळे त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले. त्यांच्या कामात कर्तव्यनिष्ठा आणि संवेदनशीलता कायमच दिसून आली. निवडणुकीतील हा विजय त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची पावती मानली जात आहे. जनतेने राजकीय आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कामावर विश्वास ठेवत त्यांना निवडून दिले. हा निकाल समाजासाठी प्रामाणिकपणे झटणाऱ्या व्यक्तीला जनता विसरत नाही, हे अधोरेखित करतो. नगरसेवक म्हणून नरेंद्र वानखडे यांच्याकडून चांदूर बाजार शहराला विकासाभिमुख, पारदर्शक व संवेदनशील प्रशासनाची अपेक्षा आहे. आरोग्य, स्वच्छता, मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या प्रश्नांबाबत त्यांचा अनुभव शहराच्या प्रगतीसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. रुग्णसेवक ते नगरसेवक हा प्रवास समाजसेवेच्या मूल्यांना मिळालेला सन्मान आहे.

# महाराष्ट्र प्राथमिक शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## शैक्षणिक साहित्याचेही वितरण



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि. 8 ) –** चांदूर बाजार येथील महाराष्ट्र प्राथमिक शाळेच्या प्रांगणात दि. 6 जानेवारी 2026 रोजी स्व. वंदना देशमुख मेमोरियल ट्रस्ट, यवतमाळ यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दलची जिद्द, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन अधिक बळावल्याचे दिसून आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदीप व. देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून विनोद कोरडे, मनोज कटारिया, रमेश तायवाडे, राजेश भेले व भाई देशमुख उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक डी. एन. कोहळे, शिक्षकवृंद व कर्मचारी वर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच वह्या, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्रदीप व. देशमुख यांनी आर्थिक अडचणीमुळे कोणाचेही शिक्षण थांबू नये, असे सांगत शाळेसाठी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली. कार्यक्रमाबद्दल उपस्थितांनी ट्रस्ट व शाळा प्रशासनाचे कौतुक केले.

# प्रौढांसह लहान मुलांनाही व्हायरलचा फटका

## घसा दुखीचा त्रास वाढला

## हवामान बदलाचा परिणाम



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.8 )–** शहरासह ग्रामीण भागात सध्या घसा दुखणे, खवखव, सर्दी–खोकला अशा तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. हवामानातील अचानक बदल, तापमानातील चढ–उतार आणि थंडी–उष्णतेतील तफावत यामुळे व्हायरल संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असून त्याचा फटका प्रौढांसह लहान मुलांनाही बसत असल्याचे दिसून येत आहे.

घसा दुखणे ही या व्हायरल संसर्गाची सुरुवातीची प्रमुख लक्षणे असून काही रुग्णांमध्ये ताप, अंगदुखी, नाक वाहणे, डोकेदुखी आणि अशक्तपणा अशी लक्षणे आढळत आहेत. विशेषतः शाळकरी मुलांमध्ये हा संसर्ग वेगाने पसरत असल्याचे बालरोगतज्ज्ञांनी नमूद केले आहे. बहुतेक रुग्णांमध्ये हा आजार सौम्य स्वरूपाचा असतो; मात्र दुर्लक्ष केल्यास त्रास वाढू शकतो, असा इशारा डॉक्टरांनी दिला आहे. थंड पेये, अपुरी विश्रांती, धूळ–प्रदूषण आणि बदलते हवामान यांचा रोगप्रतिकारक शक्तीवर विपरीत परिणाम होत असल्याचेही तज्ज्ञांचे मत आहे. दरम्यान, नागरिकांनी घसा दुखत असल्यास कोमट पाणी पिणे, मिठाच्या पाण्याने गुळण्या करणे, पुरेशी विश्रांती घेणे व स्वच्छता पाळणे आवश्यक आहे. लक्षणे वाढल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा. लहान मुलांच्या बाबतीत विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले असून शाळांमध्येही आरोग्यविषयक दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

> थंडीच्या दिवसांत गरम कपडे परिधान करावेत, शक्यतो थंडीत बाहेर जाणे टाळावे. कोमट पाणी व मिठाच्या पाण्याने गुळण्या उपयुक्त ठरतात. त्रास वाढल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
>
> **डॉ. ललित चव्हाण**

> लहान मुलांना थंडीपासून संरक्षण करणारे कपडे घालावेत, आजूबाजूचे वातावरण स्वच्छ ठेवावे. त्रास अधिक असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच औषधोपचार करावेत.
>
> **–डॉ.वैभव कराळे, बालरोगतज्ज्ञ.**

# मुझफ्फरपुरात घरफोडी

**अमरावती –** बुधवारी रात्री उशिरा नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुझफ्फरपुरा परिसरात चोरट्यांनी एका महिलेच्या घराला लक्ष्य करून घरफोडी केली. या घरफोडीत सुमारे 70 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले. या प्रकरणी संबंधित महिलेच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# मनोरुग्णाने पेटविली मोटरसायकल

## अंजनगाव सुर्जीच्या जुन्या वस्तीतील प्रकार



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि. 8 ) –** अंजनगाव सुर्जी शहरातील जुन्या वस्ती परिसरात आज पहाटेच्या सुमारास एक धक्कादायक प्रकार घडला असून, एका मनोरुग्ण व्यक्तीने घरासमोर उभी असलेली मोटरसायकल पेटवून दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना आज पहाटे सुमारे 3 वाजताच्या सुमारास घडली. शनिवारा रोड, बारगणपुरा येथील रहिवासी सुरेश आवंडकर यांच्या मालकीची बजाज कंपनीची पल्सर (क्र. एमएच–27 डीएन 1461) ही मोटरसायकल घरासमोर उभी होती. अज्ञात व्यक्तीने या दुचाकीला अचानक आग लावल्याने ती पेटून उठली.

मोटरसायकल जळत असल्याचे लक्षात येताच आवंडकर व परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेऊन आग विझवली. मात्र, तोपर्यंत दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. सदर प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्यात संबंधित व्यक्ती स्पष्टपणे दिसून येत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, सदर व्यक्ती मनोरुग्ण असल्याचे सांगण्यात येत असून, यापूर्वीही त्याने परिसरात उभ्या असलेल्या काही वाहनांचे नुकसान केल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच अंजनगाव सुर्जी पोलिसांनी तात्काळ कारवाई करून संबंधित व्यक्तीस ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे जुन्या वस्ती परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांकडून अशा घटनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# कडाक्याच्या थंडीतही मेंढपाळांची भटकंती सुरू

**नितीन दुर्बुडे**
**पथ्रोट, ( दि. 8 ) –** डोक्यावर भगवा, गुलाबी फेटा किंवा पांढरी टोपी, खांद्यावर घोंगडी आणि हातात काठी घेऊन जिवाभावाच्या मेंढ्यांची राखण करणारे मेंढपाळ अचलपूर, अंजनगाव, दर्यापूर तसेच अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात अनेक ठिकाणी सध्या पाहायला मिळत आहेत. कडाक्याची थंडी, चारा व पाण्याची टंचाई असूनही त्यांची भटकंती सुरूच आहे.

सध्या डोंगरमाळ भागात चाऱ्याची तीव्र कमतरता जाणवत आहे. त्यामुळे मेंढ्यांच्या पोटासाठी एका शिवारातून दुसऱ्या शिवारात वणवण करावी लागत आहे. मोकळ्या रानात पाल ठोकून वाडा बसवणे, उघड्यावर तीन दगडांची





चूल मांडून स्वयंपाक करणे आणि चार दिवस इथे तर चार दिवस दुसऱ्या ठिकाणी मुक्काम करणे, हीच मेंढपाळांची दिनचर्या आहे. पोरंबाळं, कोंबड्या, कुत्रे आणि बकऱ्यांचा लवाजमा घेऊन ही भटकंती वर्षानुवर्षे सुरू आहे.

धनगर समाज पारंपरिक मेंढपाळ व्यवसाय करतो. एका मेंढपाळाकडे साधारण पन्नास ते पाचशेपर्यंत बकऱ्यांचा कळप असतो. बकऱ्यांची पैदास, विक्री, लोकर कापणे व घोंगडी बनविणे यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. खरीप हंगामानंतर सोयाबीन, तूर व कापूस वेचणी झालेली शेतजमीन अनेक शेतकरी चराईसाठी उपलब्ध करून देतात. मेंढ्यांचे शेणखत जमिनीची पोत सुधारून पुढील उत्पादन वाढीस मदत करते.

मात्र ठिकठिकाणी चारा न मिळाल्याने स्थलांतराशिवाय पर्याय राहत नाही. अनशापोटी चाऱ्यासाठी भटकणाऱ्या आमच्या बकऱ्यांकडे पाहून काळीज तुटते, अशी व्यथा एका मेंढपाळाने व्यक्त केली. वनक्षेत्रात चराईवर बंदी असल्याने वन विभागाशी संघर्षाच्या तक्रारीही वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने बंदिस्त किंवा अर्धबंदिस्त मेंढीपालनाला प्रोत्साहन देणे, कायमस्वरूपी शेड, पिण्याचे पाणी, चारा व बहुवार्षिक गवत बियाणे उपलब्ध करून देण्याच्या योजना राबवाव्यात, अशी मागणी मेंढपाळांकडून होत आहे. दिवाळीनंतर सुरू झालेली ही भटकंती जूनमध्ये पावसाळा सुरू झाल्यावरच थांबते.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

